# बहुजन साहित्य - संस्कृती विशेषांक

ामगार साहित्य

मुस्लिम साहित्य

आदिवासी साहित्य

दलित साहित्य

भटक्यांचे साहित्य

शेतकरी साहित्य

स्त्रीवादी साहित्य

ांतिसिंह नाना पाटील अकादमीचे अनियतकालिक

# सत्यशोधक दिशा





क्रांतिसिंह नाना पाटील अकादमीचे अनियतकालिक

# सत्यशोधक दिशा

कार्यकारी संपादक

विश्वनाथ आठवले, प्रा. ज्ञानेश्वर वाल्हेकर

नो. क्र.-महा. ५२०२

• संयोजक •
किशोर ढमाले

• संपादक मंडळ •
प्रा. आदिनाथ इंगोले
सरोज कांबळे
प्रा. सुभाष खिलारे
प्रा. सिद्धार्थ तांबे
शिवाजी भालेराव

• मार्गदर्शक •
बाबुराव बागुल
प्रा. इंदिरा आठवले
प्रा. रामप्रसाद तौर
तुळशी परब
प्राचार्य म. ना. कांबळे
युवराज बावा

• व्यवस्थापक •
रविंद्र घोडराज

• प्रकाशक •
किशोर जाधव

• सल्लागार •
सिद्धार्थ जगदेव
राजेंद्र जाधव
डॉ. अनिल सोनवणे
डॉ. संजय जाधव
अरुण काळे
प्रा. गंगाधर अहिरे
जयंत खडताळे

• निर्मिती •
रविंद्र जोगदंड
अजित देशमुख
•

प्रकाशन २४ ऑक्टो. १९९८,
सटाणा, जि. नाशिक

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य प्रवाह | डॉ. भारत पाटणकर | ३ |
| दलित-ग्रामीण-आदिवासी संयुक्त साहित्य संमेलनाच्या आगामी वाटचालीसाठी मध्यममार्ग | निवेदन | ५ |
| पर्यायी सौंदर्यशास्त्राचा प्रश्न आणि शरद पाटलांचे योगदान | किशोर जाधव | ८ |
| ब्राह्मणी साहित्य संमेलने कोणती राजकीय कार्ये पार पाडतात ? | प्रा. रणजित परदेशी | १४ |
| गिरणगाव कालचा आणि आजचा | सचिन रोहेकर | २० |
| लोकशाहीर कॉ. अमरशेख | बाळासाहेब लबडे | २५ |
| कॉ. अण्णाभाऊ साठे | रवि जोगदंड | २७ |
| नव्या परिस्थितीला दलित लेखक भिडतीलच : बाबुराव बागुल | युवराज बावा, मंगला गोसावी | ३० |
| ग्रामीण कादंबरीतील शेतकऱ्यांचे चित्रण | प्रा. ज्ञानेश्वर वाल्हेकर | ३४ |
| आदिवासी साहित्यापुढील आव्हाने | भुजंग मेश्राम | ३९ |
| संत कवयित्रींच्या साहित्यातील स्त्री-पुरुष नाते धावता आलेख | डॉ. विद्युत भागवत | ४२ |
| स्त्रीवादी साहित्यसमीक्षा : पुनर्विचाराची गरज | शर्मिला रेगे | ४५ |
| स्त्रियांच्या चळवळी व मराठी साहित्य | प्रा. इंदिरा आठवले | ४८ |
| मुस्लिम मराठी साहित्य | प्रा. महेबुब सय्यद | ५४ |
| ख्रिस्ती मराठी साहित्य : वास्तव आणि आत्मपरिक्षण | सुधीर शर्मा | ५८ |
| ख्रिस्ती साहित्यातील ख्रिस्ती समाजदर्शन | सौ. मंगला खंडागळे | ६० |
| १९८० नंतरची दलित कविता | विश्वनाथ आठवले | ६४ |
| कार्यकर्त्यांचे सांस्कृतिक विश्व | | |
| कॉ. इंदूताई पाटणकर | कॉ. ए. डी. भोसले | ७१ |
| डॉ. पी. टी. गायकवाड | ॲड. सुभाष पाटील | |
| रेखा ठाकूर | प्राचार्य म. ना. कांबळे | |
| विषमताविरोधकांच्या योगदानावर चर्चा का नाही ? | भास्करराव जाधव | ७९ |
| दलित स्त्रियांची आत्मकथने : एक निरिक्षण | डॉ. मनोहर जाधव | ८२ |

### कविता

| | | | |
|---|---|---|---|
| अरुण काळे | ६ | सिद्धार्थ तांबे | ५६ |
| आकाश सोनवणे | १३ | मनोहर वाकोडे | ६९ |
| शाम सराफ | ३७ | विलास घोगरे | ६९ |
| प्रदीप जाधव | ४६ | काशिनाथ मंजुळा वेलदोडे | ८६ |
| भुजंग मेश्राम | ५६ | प्रकाश मोगले | ८७ |

संपर्क : किशोर जाधव, द्वारा प्रा. प्रतिमा परदेशी, सत्यशोधक निवास, ७५४, कसबा पेठ, सातातोटी पोलीस चौकीसमोर, पुणे -११

# स्त्रीवादी साहित्यसमीक्षा : पुनर्विचाराची गरज

- शर्मिला रेगे

१९७५ सालानंतर नवीन सामाजिक चळवळींनी ज्ञानक्षेत्रांची सखोल चिकित्सा करण्यास सुरूवात केली. स्त्री-मुक्ती चळवळीतून अशा प्रकारची चिकित्सा पुढे आली. इतिहास, सामाजिक शास्त्रे, साहित्य इत्यादी ज्ञानशाखांची स्त्रीवादी दृष्टिकोनातून मीमांसा केली गेली. त्याचबरोबर स्त्रियांच्या साहित्यावर बराच सैद्धांतिक उहापोह झाला आणि स्त्रीवादी साहित्य-समीक्षेचे एक स्वतंत्र ज्ञानक्षेत्र निर्माण झाले. या ज्ञानक्षेत्राचा विकास विविध टप्प्यातून होत गेल्याचे आढळते. पहिल्या टप्प्यात प्रमुख प्रवाही साहित्यातील पुरुषप्रधानतेवर टिका करताना स्त्रियांच्या साहित्याला दृश्य रूप देण्याचा प्रयत्न केला गेला. स्त्रियांच्या साहित्याची परंपरा अधोरेखीत करण्यात आली. पुढील टप्प्यात स्त्रियांचे साहित्य पुरुषांच्या साहित्याइतकेच प्रगल्भ व व्यापक कसे आहे हे सिद्ध करण्यासाठी स्त्री लेखिकांच्या साहित्यिक कर्तबगारीबद्दल बरेच लिहिले गेले. स्त्रियांच्या साहित्याचे विशिष्टत्व व भिन्नत्व प्रतिपादन करताना या भिन्नत्वाची कारणमिमांसा करण्यात आली. स्त्रियांचे साहित्य पुरुषांच्या साहित्यापेक्षा मुलभूतदृष्ट्या भिन्न असण्याची कारणे काहींनी स्त्रियांच्या विशिष्ट भावनिक विश्वात शोधली तर इतरांनी त्यांचा संबंध सरळसरळ शारिरीक भिन्नत्वाशी जोडताना स्त्रियांचा मातृत्वाचा अनुभव अधोरेखीत केला. एकंदरीत पहिल्या टप्प्यांमध्ये स्त्रियांच्या साहित्याची चिकित्सा करताना प्रमुख प्रमाणके ही पुरुषांच्या कामगिरीचीच राहिली. त्याचबरोबर साहित्य आणि प्रस्थापित सत्तासंबंध यांच्यातील मुलभूत प्रश्न पुढे आले नाहीत. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता लिखित माध्यमाचे प्रणेते आणि वाचक उच्चवर्णीय व उच्चवर्गीय पुरुष होते. त्यामुळे त्यांनीच चिकित्सेचे निकषही ठरवले होते. या ब्राह्मणी साहित्य परंपरेने मौखिक साहित्याच्या परंपरेला कमी लेखले होते. स्त्रियांच्या विविध अभिव्यक्ती प्रामुख्याने मौखिक परंपरेतच मोडतात. स्त्री-मुक्ती चळवळींनीसुद्धा स्त्रियांच्या साहित्यिक अभिव्यक्तीचा संबंध स्त्रियांची गाणी व ओव्या यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. वास्तविक ही परंपरा स्त्रीवादी साहित्यचिकित्सेचा गाभा असणे स्वाभाविक होते. परंतु स्त्रीवादी समीक्षा मुख्यत: कादंबरी, कथा व आत्मकथन या साहित्य प्रकारांवरच केंद्रीत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे स्त्रियांनी लिहिलेल्या कथा, कादंबऱ्यांमधून एकंदरीत स्त्री जीवनाविषयीचे निष्कर्ष काढण्यात आले. विशिष्ट जातीवर्गाच्या स्त्रियांनी केलेल्या लिखाणावरून सर्व भारतीय स्त्रियांबद्दल सामान्यीकरण केले गेले. सर्व भारतीय स्त्रिया व त्यांच्यामधील भगिनीभाव गृहित धरताना सर्व स्त्रिया 'दलितच' असतात असेही विधान केले गेले. सर्व स्त्रिया 'दलितच' असतात असे प्रतिपादन करताना सर्व दलित पुरुषच असतात आणि सर्व स्त्रिया जणू 'सवर्णच' असतात असे गृहित धरले गेले. थोडक्यात म्हणजे दलित बहुजन स्त्रियांचा विशिष्ट अनुभव या प्रकारच्या स्त्रीवादी समीक्षेकडून दुर्लक्षित राहिला. स्त्रीवादी चिकित्सा करताना सर्व स्त्रिया हे संकल्पनात्मक एकक मर्यादित ठरते आणि 'लिंगभाव' ही संकल्पना अधिक उपयुक्त ठरते. कारण पुरुषप्रधान व्यवस्था एकसंध नसून जाती, धर्म आणि वर्गानुसार पुरुषप्रधानतेचे स्वरूप बदलत जाते. एकंदरीत लिंगभावाची जडणघडण स्त्री दास्याचे स्वरूप हे वर्ग आणि जातिधिष्ठित असते हे एकदा मान्य केले की सर्व स्त्रिया अशी संकल्पना उभी राहू शकत नाही.

गेल्या दशकात जागतिक पातळीवर काळ्या व तिसऱ्या जगातील स्त्रियांनी प्रमुख प्रवाही स्त्रीवादावर टीका करतांना स्त्रियांमध्ये वर्ग, वर्ण आणि राष्ट्र यावरून पडणाऱ्या विभेदनावर लक्ष केंद्रित केले. स्त्रीवादी साहित्य म्हणजे गोऱ्या स्त्रियांनी लिहिलेले साहित्य या प्रस्थापित समीकरणाला शह देताना त्यांनी काळ्या स्त्रियांच्या लिखाणाची पर्यायी परंपरा उभी केली. या साहित्याने साहित्याच्या क्षेत्रात सांस्कृतिक विद्रोह निर्माण केला हे जरी खरे असले आणि आज या साहित्याचा भरपूर खप होत असला तरी त्यातील विद्रोह मात्र संपुष्टात आलेला आहे. त्यातून काळ्या स्त्रीवादी संमिक्षेचा एक नवीन प्रवाह उगम पाऊन स्त्रीवादी समिक्षेच्या क्षेत्रात केवळ एक नवा प्रवाह म्हणून रूजला गेला.

भारतीय संदर्भात विचार केल्यास देखील नवहिंदुत्ववादी संघटनांमध्ये स्त्रियांचा वाढता सहभाग, मंडलविरोधी आंदोलनातील पुढाकार, ओबीसी स्त्रियांच्या आरक्षणाला होत असलेला विरोध यावरून 'भारतीय स्त्रिया' अशी एकसंध संकल्पना स्त्रीवादी विश्लेषणामध्ये असूच शकत नाही हे नक्की अशी खात्री पटते. म्हणूनच कोणत्याही साहित्याची स्त्रीवादी चिकित्सा करताना त्या साहित्याचा निर्माता स्त्री आहे की पुरुष यावर केवळ लक्ष केंद्रित करून चालणार नाही तर त्या साहित्याचा ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेऊन त्या संहितेचे स्त्रीवादी, भौतिकवादी वाचन करणे आवश्यक ठरते. म्हणजेच स्त्रियांचे साहित्य मग ती गाणी असोत, जात्यावरच्या ओव्या असोत किंवा आत्मकथने असोत ही सर्व पुरुषप्रधान व्यस्थेच्या चौकटीतूनच निर्माण झालेली असतात. त्यामुळे लिंगभाव विचारप्रणालीचा त्याच्यावर प्रभाव असतोच पण द्वंद्वात्मक दृष्टिकोनातून पाहता याच पुरुषप्रधान चौकटीत निर्माण झालेल्या साहित्यातच स्त्रियांनी पुरुषप्रधान व्यवस्थेला केलेला विरोध प्रतिबिंबीत झालेला आढळतो. अर्थातच स्त्रियांनी पुरुषप्रधानतेचा केलेला प्रतिकार आणि विरोध हा जातीवर्गानुसार भिन्न असतो. ही गोष्ट सुद्धा लक्षात येते.

१९७५ सालानंतर प्रमुख प्रवाही स्त्री-मुक्ती चळवळींनी प्रामुख्याने स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांचा प्रश्न पुढे आणला कुटुंबांतर्गत होणारा अत्याचार, बलात्कार आणि हुंडा पद्धती यांना विरोध करणारी आंदोलने उभी राहिली. छोट्या स्वायत्त गटांमधून स्त्रिया बोलत्या होऊ लागल्या आणि लैंगिकता व अत्याचार यासारख्या आजपर्यंत व्यक्तीगत समजल्या जाणाऱ्या बाबींवर सार्वजनिक क्षेत्रात चर्चा होऊ लागली.

'जे जे खाजगी ते ते राजकीय' अशी घोषणा देणाऱ्या स्त्रीवादी चळवळींनी कुटुंब, अत्याचार आणि लैंगिकता यासारख्या प्रश्नांचे विश्लेषण करताना अनुभववादी दृष्टिकोन स्वीकारला. अनुभवकथन तसेच स्त्रीवादाने प्रभावित झालेल्या लेखिकांच्या साहित्यामधून व्यक्तीवादी स्त्रीवादी जीवनप्रणाली पुढे आली. पर्यायी विवाह संबंध, कुटुंब रचना, स्त्री-पुरुष संबंध याबाबतचे स्त्रीवादी साहित्य हे व्यक्तिगत प्रयोगाविषयीचे साहित्य बनले. विवाह, कुटुंब व्यवस्था व लैंगिकता यांचा जातिव्यवस्थेशी अनन्यसाधारण संबंध आहे. डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे स्त्रिया जातिव्यवस्थेची प्रवेशद्वारे असतात व त्यामुळे आपल्या स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण व इतर स्त्रियांच्या लैंगिकतेचा वापर हा ब्राह्मणी पुरुषप्रधान व्यवस्थेचा पाया होय. प्रमुख प्रवाही साहित्यामध्ये या प्रश्नाकडे दूर्लक्ष झाल्याचे दिसून येते. स्त्रीवादी समीक्षेला खऱ्या अर्थाने मुक्तीवादी परिदृष्टीचा अवलंब करायचा असेल तर त्यासाठी अब्राह्मणी स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून स्त्रीवादी समीक्षेचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

मार्क्सने प्रतिपादन केल्याप्रमाणे समाजातील सत्ताधारी स्थानांवरून झालेली ज्ञाननिर्मिती साहित्य व कलाकृती या प्रमाणशास्त्रीयदृष्ट्या मर्यादित असतात. कारण सत्ताधिष्ठित स्थानांवरून झालेले लिखाण व रचनांमधून वास्तवाची व्यापकता अभिव्यक्त होत नाही तसेच मुक्तीवादी परिदृष्टी देण्याच्यादृष्टीने देखील हे साहित्य तुटपुंजे ठरते. या उलट परिघावरून म्हणजेच सत्ताहीन स्थानावरून झालेली साहित्यनिर्मिती ही अधिक व्यापक आणि मुक्तीवादी असते हे नमूद करावे लागेल. दलित, कष्टकरी, भटक्या, विमुक्त स्त्रियांच्या भौतिक व सांस्कृतिक वास्तवातून निर्माण झालेले हे साहित्य स्त्रीवादी साहित्याच्या केंद्रस्थानी येणे आवश्यक आहे म्हणजेच दलित, भटक्या विमुक्त स्त्रियांचे अनुभव नमूद करणाऱ्या साहित्याचे स्त्रीवादी वाचन करताना त्यांच्या अनुभवांची जडणघडण समाजातील प्रमुख शोषण शासनाच्या व्यवस्थांमधून कशी होते ते अधोरखीत करणे होय. दलित - आदिवासी स्त्रियांच्या साहित्याचा अशा प्रकारच्या स्त्रीवादी वाचनातून पुरुषप्रधान व्यवस्था, जातीव्यवस्था आणि वर्गव्यवस्था यांच्यातील परस्पर संबंधांवर अधिक प्रकाश पडेल हे निश्चित. एकंदरीत अब्राह्मणी स्त्रीवादी दृष्टिकोनातून स्त्रीवादी समीक्षेचा पुनर्विचार करणे म्हणजेच स्त्रीवादी दृष्टिकोनतून स्त्रीवादी जाणीवांचे सामूहिक संघर्षामध्ये रूपांतर करणे होय.

❖❖❖

● कविता ● **म्हणालोही असतो**

म्हणालोही असतो गर्वाने
हम है हिन्दू
पण उद्या तुम्हीच माझी जात विचाराल
आणि वरून माराल फुशारकी
की आम्ही जात पात काही मानत नाही!
म्हणालोही असतो गर्वाने
हम है हिन्दू
पण उद्या तुम्हीच ऐकवाल
नव्याने गीता
आणि लढवाल भावाविरुद्ध भाऊ
यादवीत तुमच्या सांगा
कुणीच का निरपराध मरणार नाही?
म्हणालोही असतो गर्वाने
हम है हिन्दू
पण उद्या तुम्हीच मागाल वर्गणी
आणि म्हणाल चला मनुचे मंदीर बांधू
अरे कसे विसरलात इतक्यात
त्यानेच तर बाटवलीय
तुम्ही जिचा उदो उदो करताहात ती संस्कृती!
म्हणालोही असतो गर्वाने
हम है हिन्दू
पण उद्या तुम्हालाच दिसेल
आणखी एखादी पुरातन वास्तू
प्रश्न त्या वास्तूचा नाही
अरे आम्ही आत्ताच तर
उभी केलीय कशीबशी
गेल्या पडझडीतून आमची वस्ती!

● प्रदीप जाधव
नाशिक

❖❖❖


हार्दिक शुभेच्छा!
**नम्रता फर्निचर्स**
प्रो. प्रा. बाळासाहेब भानुदास मोरे
मु. पो. ता. नेवासा
जि. अहमदनगर



*अब्राह्मणी साहित्यांच्या*
*"सत्यशोधक दिशा" विशेषांकास*
हार्दिक शुभेच्छा!
**श्री. सावता माळी प्रेस**
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.